

# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३१९, बुधवार ११ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## औरंगाबाद ते पुणे रस्त्याचा ताबा राष्ट्रीय महामार्गाकडे द्या

### खा. नीलेश लंके यांचे शिंदे, गडकरी, पवार व फडणवीसांना साकडे



नगर : प्रतिनिधी

**औरंगाबाद-नगर ते पुणे या महामार्गाचा ताबा राष्ट्रीय महामार्गाकडे देऊन या महामार्गाचे काम नहीकडून एका टप्प्यात पुर्ण करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय रस्ते वाहतूक, महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**

या पत्रामध्ये नमुद करण्यात आले आहे की, औरंगाबाद-नगर ते पुणे हा महामार्ग सहा पदरी करण्यात येऊन तो काँक्रीटीकरणाने बांधण्यात यावा. त्यासाठी या महामार्गाचा ताबा राष्ट्रीय महामार्गाकडे देण्यासंदर्भात आपणासह शिरूरचे खासदार डॉ.अमोल कोल्हे, औरंगाबादचे खासदार संदिपान भुमरे यांनी केंद्रीय वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांची जुलै महिन्यात भेट घेऊन मागणी केली होती. याच मागणीसंदर्भात गडकरी यांच्याशी पत्रव्यवहारही करण्यात आलेला आहे. २२५ किलोमिटर लांबीचा हा रस्ता केंद्र सरकाच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५ एफ यापूर्वीच घोषीत करण्यात आलेला आहे. फक्त या रस्त्याचा ताबा राष्ट्रीय महामार्गाकडे गेलेला नसल्याकडे लंके यांनी या पत्राद्वारे लक्ष वेधले आहे.

दरम्यान हा महामार्ग राज्य सरकारच्या वतीने एमएसआयडीसी मार्फत तीन टप्प्यात करण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे. दुर्देवाने एमएसआयडीसी कडे कुठल्याही प्रकारचे मनुष्यबळ उपलब्ध नाही. तसेच मुंबई वगळता इतरत्र कोणत्याही अधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही नाहीत. त्यामुळे हा रस्ता राज्य सरकारकडून पुर्ण होईल की नाही याबाबत प्रश्नचिन्ह आहेत. या महामार्गाचे तीन टप्पे करून तीन टोलनाके टाकून टोल वसुली करणे अन्यायकारक आहे. यामुळे सामान्य लोकांसह औद्योगिक क्षेत्रातील वाहतूकीला मोठा आर्थिक फटका बसणार आहे. शिवाय रस्त्याच्या कामाचा दर्जा कसा राहिल हे सांगता येत नाही. सद्यस्थितीत हा रस्ता प्रचंड खराब झालेला असून त्याचे तात्काळ कोम होणे अत्यंत गरजेचे आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणूका पाहता या रस्त्याची घोषणा घाईत झालेली दिसते तसेच विधानसभा निवडणूकीमुळे या रस्त्याच्या कामास विलंब होऊ शकतो अशी शंकाही लंके यांनी या पत्रात व्यक्त केली आहे.

#### एका टप्प्यात रस्त्याचे काम पुर्ण होईल

**ज्या खाजगी उद्योजकाने या रस्त्याची बांधणी केली आहे त्यांची उर्वरीत रक्कम एकत्रीत आदा करून औरंगाबाद-अहमदनगर ते पुणे महामार्गाचा ताबा राष्ट्रीय महामार्गाकडेच देण्यात यावा व महामार्गाचे काम नहीकडूनच करण्यात यावे जेणेकरून या महामार्गाचे काम एका टप्प्यात पुर्ण होउन सहापदरी काँक्रीटचा रस्ता होईल असा विश्वास लंके यांनी या पत्रात व्यक्त केला आहे.**

## मुंबई, विदर्भ, मराठवाड्यात मविआ सुस्साट!

### महायुतीला किती जागा? चिंता वाढवणारा सर्व्हे

मुंबई: प्रतिनिधी



**लोकसभेला सपाटून मार खाणारी सत्ताधारी महायुती विधानसभेलादेखील पराभूत होईल, असा अंदाज लोक पोलने केलेल्या सर्वेक्षणातून समोर आला आहे. लोकसभेला मिशन ४५ हाती घेणाऱ्या महायुतीला राज्यात केवळ १७ जागा मिळाल्या. गेल्या लोकसभेला युतीला ४१ जागा मिळाल्या होत्या. मात्र यंदा महायुतीला मतदारांनी जोरदार धक्का दिला. आता विधानसभेलादेखील त्याचीच पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे.**

राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. बहुमतासाठी १४५ जागा गरजेच्या आहेत. लोक पोलच्या सर्व्हेनुसार महाविकास आघाडीला १४१ ते १५४ जागा मिळण्याचा अंदाज आहे. त्यांना ४१ ते ४४ टक्के मतं मिळण्याची शक्यता आहे. तर सत्ताधारी महायुतीला ११५ ते १२८ जागा मिळू शकतात. त्यांना ३८ ते ४१ टक्के मतं मिळण्याचा कयास आहे. तर अन्य पक्षांना, अपक्षांना ५ ते १८ जागा मिळण्याचा अंदाज आहे. त्यांच्या पारड्यात १५ ते १८ टक्के मतदान जाऊ शकते.

ठाणे-कोकण पट्ट्यात महायुती महाविकास आघाडीला मागे टाकेल असा अंदाज आहे. तर खानदेशात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चुरस आहे. विदर्भ, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यात महाविकास आघाडीचा बोलबोला राहण्याची शक्यता आहे. लोकसभेतही या सगळ्या भागांमध्ये महाविकास आघाडीची कामगिरी दमदार झाली होती. त्याचीच पुनरावृत्ती आता विधानसभेत होण्याची चिन्हं आहेत.

विदर्भातील केवळ १५ ते २० जागांवर महायुतीला यश मिळेल असा अंदाज आहे. तर महाविकास आघाडीचे उमेदवार ४० ते ४५ जागांवर बाजी मारतील, अशी शक्यता आहे. लोक पोलच्या सर्व्हेनुसार खानदेशात महायुती आणि महाविकास आघाडीला प्रत्येकी २० ते २५ जागा मिळू शकतात. ठाणे-कोकण पट्ट्यात महायुतीला २५ ते ३० जागा मिळू शकतात. तर महाविकास आघाडीला केवळ ५ ते १० जागा मिळण्याची शक्यता आहे.

## मनोज जरांगे यांचे पुन्हा उपोषणास्त्र; १७ सप्टेंबरपासून आंदोलनाचा निर्धार

जालना : प्रतिनिधी

**मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे हे येत्या १७ सप्टेंबरपासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा आमरण उपोषण करण्याचा निर्धार केला आहे. आहेत. जरांगे यांनी मंगळवारी जालन्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना ही घोषणा केली.**

जरांगे यांनी याआधी आपण २९ सप्टेंबरला आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला होता. मात्र, आता ते १७ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करणार आहेत. 'राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे.



मनोज जरांगे पाटील यांच्या आंतरवाली सराटीतील आंदोलनामुळे महायुती सरकारची चांगलीच कोंडी झाली होती. राज्यभरात त्याचे पडसाद उमटले होते. लोकसभा निवडणुकीत याचा फटका महायुतीला बसला होता. मराठा आमदारांनी महायुतीच्या उमेदवारांविरोधात कौल दिल्याने अनेक जागांवर सत्ताधारी आघाडीचे उमेदवार पडले होते. यामध्ये पंकजा मुंडे आणि रावसाहेब दानवे यांच्यासारख्या मोठ्या उमेदवारांचा समावेश होता.

काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीत राज्यभरात २८८ उमेदवार उभा करण्याची घोषणा केली होती. यानंतर ते घोंगडी सभा घेऊन वातावरण तापवत आहेत. मात्र, आता जरांगे पाटील हे मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाच्या दिवशी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणाला बसणार आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मराठा आरक्षणाचा मुद्दा नव्याने तापू शकतात. असं घडल्यास भाजप आणि महायुती सरकार यावर काय भूमिका घेणार हे पाहावे लागणार आहे.

## पारनेरमध्ये आधार केंद्र सुरू करा

### ■ खा. नीलेश लंके यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी
### ■ आधार कार्ड कॅम्पचे आयोजन करण्याचीही मागणी

पारनेर : प्रतिनिधी




**पारनेर शहरात कायमस्वरूपी आधार कार्ड केंद्र सुरू करण्याबरोबरच १८ वर्षावरील नागरीकांचे आधार कार्ड काढण्यासाठी तात्काळ विशेष कॅम्पचे आयोजन करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**

जिल्हाधिकारी कार्यालयाकडें पाठविलेल्या पत्रात खा. लंके यांनी नमुद केले आहे की, १८ वर्षांवरील वयाच्या नागरीकांचे आधार कार्ड काढण्यासाठी तालुक्यात एकही आधार केंद्र नाही. त्यामुळे तालुक्यातील १८ वर्षावरील नागरीकांना आधार कार्ड काढण्यासाठी नगर येथे जावे लागते. त्यासाठी पारनेर येथे विशेष कॅम्पचे आयोजन करून १८ वर्षावरील नागरीकांचे कार्ड काढण्याची सुविधा उपलब्ध करू देण्याची मागणी लंके यांनी केली आहे.

दरम्यान, पारनेर हे तालुक्याचे ठिकाण असतानाही तिथे आधार केंद्राची सुविधा नाही. पारनेर येथे तात्काळ कायमस्वरूपी आधार केंद्र सुरू करण्यात येउन नागरीकांची गैरसोय दुर करावी अशी मागणीही खा. लंके यांनी केली आहे.

## बारामतीत पुन्हा पवार विरुद्ध पवार सामना रंगणार?

### युगेंद्र पवार यांच्या स्वाभिमान यात्रेला प्रारंभ





बारामती : प्रतिनिधी

**लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणूकीतही बारामतीत पुन्हा पवार विरुद्ध पवार सामना रंगणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. युगेंद्र पवार यांनी आपल्या स्वाभिमान यात्रेला सुरुवात केली असून जनसंपर्क वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. तर दुसरीकडे, अजित पवारांचे पूत्र जय पवार यांच्या नावाचीही चर्चा आहे. त्यामुळे बारामतीत युगेंद्र पवार विरुद्ध जय पवार सामना रंगणार का? असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.**

युगेंद्र पवार यांनी मंगळवारपासून स्वाभिमान यात्रेला सुरुवात केली असून याद्वारे ते बारामतीतील गावांना भेटी देणार आहेत. दरम्यान, त्यांना विधानसभेच्या उमेदवारीबद्दल विचारले असता ते म्हणाले की, ''अजूनपर्यंत कुणाचीही उमेदवारी जाहीर झालेली नाही. परंतू, स्वाभिमान यात्रेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांमध्ये जाऊन त्यांना भेटत राहण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. बारामतीत युगेंद्र पवार आणि जय पवार असा सामना झाल्यास अजितदादांसाठी आम्ही दोघेही सारखेच आहोत. त्यामुळे मी नक्कीच अजितदादांचे आशिर्वाद घेईल,'' असे माध्यमांशी बोलताना ते म्हणाले.

दुसरीकडे, रविवारी बारामतीतील एका सभेत बोलताना अजित पवारांनी एक विधान केलं होतं. ''बारामतीत एवढी कामं करूनही बारामतीकर वेगळा निर्णयसुद्धा घेऊ शकतात. पण असं होत असल्यास झाकली मूठ सव्वा लाखाची चांगली. मी आता ६५ वर्षांचा झालो. बारामतीकरांना एकदा मी सोडून दुसरा आमदार मिळाला पाहिजे. मग त्याच्याशी माझ्या कारकिर्दीची तुलना करा,'' असे ते म्हणाले होते. शिवाय काही दिवसांपूर्वी जय पवारांच्या उमेदवारीचीही चर्चा रंगली होती. त्यामुळे यंदा बारामतीत पवार विरुद्ध पवार सामना रंगणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.










फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी



दागिन्यांचं खरं सौंदर्य पारंपरिक रूपात दिसून येत असलं तरी आता काळानुरूप दागिन्यांमध्येही बदल होताना दिसताहेत. आधुनिक पद्धतीचे, पण पारंपरिक वलय असलेले विविध स्वरूपातील दागिने तरुणींसाठी पर्वणी ठरत आहेत...

# बहुढंगी लखलखते दागिने...

ट्रेनमध्ये हँगरवर लटकवलेले कानातले डूल, पैंजण, कडे असोत किंवा फॅशन स्ट्रीटवरच्या दुकानात मोलभाव करून घेतलेले स्टेटमेंट नेकपीस, डिझायनरचं खास हटके कलेक्शन असो किंवा सोन्याच्या दुकानात डोळे दिपवून टाकणारे दागिने... स्वरूप काहीही असो दागिने स्त्रीच्या मनाला भुरळ घालणार नाहीत, असं होणं शक्य नाही. कपडे आणि दागिन्यांची हौस फिटत नाही असं म्हणतात ते उगाच नाही. पण, तरीही दागिन्यांवरचं तिचं प्रेम किंचित जास्त असतं. त्याला कारणच तसं असतं म्हणा ना. एखादं दिवशी काहीच पर्याय नाही म्हणून जुना, साधासा टॉप घालावा लागला, तर त्यासोबत छानसं कानातलं घातलं की दिवस मस्त जातो, मैत्रिणीला वाढदिवसाला गिफ्ट देताना कपड्यांच्या साईझवरून गोंधळ होऊ शकतो पण, नेकपीस, कड्याबद्दल हा गोंधळ कधीच होऊ शकत नाही. जुने कपडे काळानुसार उसवले जातात, तोकडे पडतात पण, दागिने तुमची साथ क्वचित प्रसंगीच सोडतात. दागिन्यांचं महत्त्व कवींनाही पटलं आहे. त्यामुळेच तर त्यांनी झुमक्यापासून नथनीपर्यंत, बांगड्यांपासून पैंजणांपर्यंत कित्येक दागिन्यांवर कविता-गाणी करून ठेवली आहेत, नाही का..!

आजची तरुणीसुद्धा कितीही मॉडर्न झाली असली तरी तिची दागिन्यांची आवड काही संपली नाही. त्यामुळेच तर आज तिच्यासाठी तिच्या मागणीनुसार दागिन्यांची एक मोठी बाजारपेठ उभी ठाकली आहे. त्यात पारंपरिकतेपासून आधुनिक पद्धतीच्या दागिन्यांपर्यंत, सोन्यापासून जडाऊ, हिरे कुंदनपर्यंत अनेक पर्याय तिच्यासमोर आहेत. अगदी आता-आतापर्यंत केवळ लग्न ठरल्यावर सोन्याच्या दुकानात पाय ठेवणारी तरुणी पहिला पगार, प्रमोशन, तर कधी सहज मनाला आलं म्हणून हिरे, सोन्याचे दागिने खरेदी करू लागली आहे. पण, म्हणूनच हे दागिने कडीकुलपात बंद करून फक्त सणांच्या वेळी काढण्याऐवजी रोज ऑफिस, पार्टी, गेटटूगेदरमध्ये मिरवणे ती अधिक पसंत करते. नवीन इंटर्न म्हणून ऑफिसला रुजू झाल्यावर फॅशन स्ट्रीटवर तिने केलेल्या बार्गेनचे किस्से रंगवणारी ती दोन-एक वर्षांत किती कॅरेटचा हिरा किती लकाकतो याच्या गप्पा रंगवायला लागते. तेव्हा तिच्यासोबत तिचे दागिनेसुद्धा कात टाकू लागले आहेत हे लक्षात यायला लागतं...

## इमिटेशन ज्वेलरीचा प्रभाव



तरुणींवर असलेला इमिटेशन किंवा फॅशन ज्वेलरीचा प्रभाव नाकारता येणार नाही. त्यामुळे सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीमध्ये इमिटेशन ज्वेलरीमधील मोटिफ, डिझाइन वापरलं जाऊ लागलं आहे. इमिटेशन ज्वेलरीच्या स्टाइलचे हत्ती, वाघ, सिंह असे विविध मोटिफ, झुंबराकृती, एसिमेट्रिकल आकार, पठडीच्या रंगांपेक्षा वेगळे रंग असे अनेक गुण पारंपरिक सोन्याच्या आणि हिऱ्याच्या जडणघडणीत वापरत येत आहेत. हत्तीच्या छबी वापरून अंगठ्या, पेंडेंट्स हल्ली अनेक ज्वेलर्सकडून बाजारात आणली जात आहेत.

## अंगठ्यांना पहिली पसंती

कित्येकदा तरुणी त्यांच्या साठवलेल्या पैशातून अंगठी घेण्यास पसंती देतात. तसंच हल्ली लग्नानंतर मंगळसूत्र रोज वापरण्यापेक्षा सणाच्या किंवा कार्यक्रमाच्या दिवशी कपाटाबाहेर काढलं जातं. त्याऐवजी तरुणी साखरपुड्याची अंगठी घालण्यास पसंती देतात. त्यामुळे अशा वेळी आपली अंगठी सुंदर आणि चारचौघांत उठून दिसावी याकडे भर दिला जातो. म्हणून गेल्या दोन वर्षांत अंगठय़ांच्या डिझाइन्समध्ये भरपूर विविधता पाहायला मिळाली. यामध्ये अंगठीचा रंग, आकार, साइज यामध्ये प्रयोग करण्यात आले. सध्या थ्रीडी स्टाइल आणि दोन बोटांत घालायच्या अंगठीला पसंती मिळत आहे. प्लॅटिनमच्या अंगठ्या तर साखरपुड्यासाठी पहिली पसंती असते.

## डिटॅचेबल ज्वेलरी

बाजारात 'मल्टी युझ' ज्वेलरी, 'डिटॅचेबल ज्वेलरी' अशा विविध नावांनी या दागिन्यांना संबोधले जाते. मध्यंतरी दागिन्यांच्या जाहिरातींमध्ये मॉडेलच्या केसांची छानपैकी हेअरस्टाइल करून त्यात हिरे, जडाऊचे हार खोवले जायचे. जेणेकरून हाराला हेडपीसचा लुक येत असे. खास समारंभाला आवर्जून पार्लरला जाऊन तयार होणाऱ्या तरुणी हाराचा असा वापर नक्कीच करून पाहतात. यामुळे ड्रेसचा गळा हारामुळे लपला न जाता फोकसमध्ये येतो. लुकला नवेपणाही मिळतो.


## सोन्यातही मिक्स मॅच

पूर्वी सोन्याचा हार घेताना कानातले डूल त्यासोबतच यायचे. बांगड्याही हाराला साजेशा घेतल्या जायच्या. जेणेकरून दागिन्यांचा 'सेट' बनत असे. पण हल्ली वेगवेगळ्या सेटमधील दागिने मिक्स मॅच करून घालण्याचा ट्रेंड सोन्याच्या दागिन्यांमध्येसुद्धा रुजू होत आहे. 'तरुणी हल्ली कानातले डूल, हार, बांगडय़ा असं वेगवेगळं डिझाइन आणि गरजेनुसार वेगवेगळं खरेदी करतात. मग समारंभानुसार एक किंवा अनेक दागिने घातले जातात. यामुळे त्यांना निवडक दागिन्यांतही पर्याय मिळतो. सणाच्या दिवशी साडी ते पार्टीसाठी गाऊनपर्यंत आजची तरुणी प्रसंगानुसार कपड्यांची निवड करते. त्यामुळे साडीसोबत खुलणारे कानातले हिऱ्याचे डूल गाऊनसोबत पण उठून दिसतील, याची काळजी ती खरेदी करताना घेते.

## फुलाफुलांची मोहक दुनिया...

- कोणताही कपडा नजरेत भरला की त्यावर फुलांची डिझाईन आहे का याची लगेचच विचारणा होते. विविध रंग आणि आकारांच्या देखण्या डिझाईन्स लक्ष वेधून घेतात. फ्लोरल म्हणजेच फुलांच्या डिझाईन्स, पॅटर्न्सना दागिने आणि कपड्यांमधून कधीच मरण नव्हते. पण, यंदाच्या सीझनमध्ये स्त्रियांचे फुलांवरचे प्रेम किंचित जास्तच झालंय. त्यामुळे रॅम्पवर कपडे आणि दागिन्यांमधील फ्लोरल डिझाईन्स हा यंदाचा सर्वात मोठा ट्रेंड आहे. फुलाफुलांची मोहक दुनिया आता ज्वेलरीमध्येही बघायला मिळेल.
- 'फ्लोरल आणि टेम्पल डिझाईन्स या दागिन्यांच्या बाबतीत एव्हरग्रीन असतात यात वाद नाही. पण, यंदा फ्लोरल डिझाईन्सचा झालेला वापर थक्क करणारा आहे. हे प्रमाण इतकं वाढलं की, 'फ्लोरल ज्वेलरी' नावाची नवी संज्ञा जन्माला आली. यात फुलांचे डिझाईन असलेले नेकलेस, कानातले डूल, बांगड्या असे पारंपरिक प्रकार तर आहेतच. पण, हातफूल, चोटी (केसांच्या वेणीवरचा हेडपीस) यांसारखे वापरातून मागे पडलेले जुने दागिन्यांचे प्रकार परत आले आहेत.
- कित्येक बड्या बॉलीवूड सेलेब्रिटीजनी या फ्लोरल ज्वेलरी मिरवल्या आहेत. या फ्लोरल डिझाईनला अजूनच खुलवण्याचं काम केलं आहे ते दागिन्यांना दिल्या जाणाऱ्या अनेक पदरी डिझाईनने. मागच्या वर्षीपासून थ्रीडी डिझाईन्सचा ट्रेंड दागिन्यांमध्ये रुजू झाला आहे. यामुळे दागिन्यातील फुलांमधील प्रत्येक पाकळी उलगडलेली आणि त्यातील बारीक नक्षीकाम पाहायला मिळतं. पार्टीसाठी असं फुलाचं डिझाईन असलेलं एखादं ओव्हरसाईझ कानातलं सहज घालता येतं. ते छान इंडो-वेस्टर्न, क्लासी लुक देतं. सणासमारंभाला त्यासोबत एखादा नेकपीस किंवा कडे घालून पारंपरिक लुकही मिळू शकतो. याखेरीज यंदा सिम्पल आणि सुटसुटीत डिझाईन्सवर जास्त भर दिला गेला आहे. दागिन्यांतील मुख्य मोटीफ किंवा खडा फोकसमध्ये येईल याची काळजी डिझायनर्स घेऊ लागले आहेत. त्यामुळे दागिन्यांना उठाव मिळतोच, पण बदलत्या काळानुसार डिझाईन जुनी वाटत नाही.

## एकच दागिना, वापर वेगवेगळ्या पद्धतीने...




फॅशन इंडस्ट्रीमध्ये असंख्य प्रयोग होत असतात. त्याचा अनुभव घेता येतो तो फॅशन स्ट्रीट किंवा तत्सम शॉपिंगसाठी असलेल्या लोकप्रिय ठिकाणी. हे प्रयोग बघून तरुण मुली घरच्या घरीसुद्धा त्याचं अनुकरण करतात. केवळ कपड्यांच्या बाबतीतच हे अनुकरण न करता आता त्यांनी मोर्चा वळवलाय तो ज्वेलरीकडे. कपड्यांमध्ये जसं एकच स्टोल किंवा स्कार्फ वेगवेगळ्या पद्धतीने घेतला जाऊ शकतो तसं दागिन्यांमध्ये करता येतं, याचं प्रात्याक्षिक तरुण मुली करत असतात. याचा अंदाज घेऊनच डिझायनर्सनेही उत्तम संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. एकच दागिना आता वेगवेगळ्या स्टाइल्समध्ये वापरता येईल. दिवसागणिक वाढती सोन्याची किंमत भारतीयांच्या मनातील सोन्यावरचे प्रेम कमी करू शकत नाही, हे खरं आहेच. पण, एकदा विकत घेतलेला दागिना जास्तीत जास्त कसा वापरता येईल हा प्रयत्न स्त्री करतच असते. कित्येकदा लग्नात केलेले दागिने इतके मोठे असतात, की ते छोट्या-छोट्या कार्यक्रमांना घालता येत नाहीत, तर कधी तेच तेच दागिने घालून कंटाळा येतो, मग ते मोडून नवीन दागिने करायचा घाट घातला जातो. ही गैरसोय टाळण्यासाठी डिझायनर्स एकच दागिना वेगवेगळ्या पद्धतीने कसा वापरता येईल याचा विचार करू लागले आहेत. एका कलेक्शनमधील मुख्य नेकलेसपासून अलग करता येणार पेंडंट एखाद्या चेनमध्ये घालून वेगळं घालता येऊ शकतं. त्यांच्याच 'प्लॅटर' कलेक्शनमध्ये वेगवेगळ्या रंगाच्या खड्यांचे पर्याय असलेली अंगठी देण्यात आली आहे. जेणेकरून एक अंगठी तीसहून अधिक पद्धतीने वापरता येते. तुमच्या ड्रेसला मॅच होणारी अंगठी यामुळे बदलता येते. गळ्यातील नाजूक हिऱ्यांची सर वेगळी केल्यास मांगटिका किंवा ब्रेसलेट म्हणून वापरता येईल. बाजूबंद किंवा अँकलेट म्हणून वापरता येणारा कडा असे प्रयोग यामध्ये केले जात आहेत. जेणेकरून दागिन्यांचा वापर वाढवता येणं शक्य होईल.

## स्टाइल आधुनिक, टच पारंपरिक...

तसं म्हणायला सोन्याच्या दागिन्यांच्या बाबतीतही स्त्रियांना पूर्वीपासून एखाद-दुसरी डिझाइन बघून भागायचं नाहीच. त्यांना पर्याय लागायचेच. त्यात पुरुषांप्रमाणे 'दुकानात जाऊन काही विकत न घेता बाहेर येणं विचित्र दिसतं', याबद्दल त्यांना फारसं कधीच काही वाटलं नाही. उलट जुन्याकाळी दागिन्यांचं गाठोडं घरी घेऊन येणाऱ्या सराफालासुद्धा 'माझ्या माहेरच्या सराफाच्या दागिन्यांची तोड नाही हो याला' हा टोमणा चुकत नसे. पण आजच्या घडीला केवळ फॅशन ज्वेलरी आणि इमिटेशन दागिन्यांइतकीच सोने, हिऱ्याची बाजारपेठ विस्तारू पाहात आहे. कारण आजची तरुणी सोन्याचे दागिने केवळ लग्नासाठी किंवा सणांसाठी वापरण्याऐवजी रोज वापरण्यास पसंती देऊ लागली आहे. अर्थात प्रत्येक मुलीसाठी तिचं 'लग्न' हा अजूनही तितकाच महत्त्वाचा मुद्दा आहे आणि त्यावेळी खास बनविल्या जाणाऱ्या दागिन्यांचे महत्त्वही तितकंच आहे. पण असं असताना हे दागिने लग्नानंतर कितीदा आणि किती वेगवेगळ्या प्रकारे वापरता येतील, याचं गणितसुद्धा ती करत असते. नेमकी हीच बाब डिझायनर्सनी अचूक हेरली आहे आणि त्यामुळेच तेही आता एकच दागिना वेगवेगळ्या पद्धतीने वापरता येईल अशा प्रकारचे डिझाइन्स बाजारात आणण्यास सुरुवात केली आहे. तसेच नेहमीच्या दागिन्यांच्या प्रकारांपेक्षा काही नवीन प्रकार आणण्याचे प्रयत्नही डिझायनर्सकडून करण्यात येत आहेत. पिवळं सोनं आणि सफेद हिरा यापलीकडे व्हाइट गोल्ड, रोज गोल्ड, अँटिक गोल्ड तसेच प्लॅटीनम वापरलं जाऊ लागलं आहे. कुंदन, जडावू तसेच गोल, चौकोन, त्रिकोणी, आयताकार किंवा ओव्हल अशा विविध आकाराचे, रंगांचे खडेसुद्धा सध्या दागिन्यांमध्ये वापरले जात आहेत. मीनाकारी नक्षी, जाळी डिझाइन सध्या ट्रेंडमध्ये आहे. मंदिरांवरचं नक्षीकाम तर डिझायनर्सना दिवसेंदिवस आकर्षित करत आहे. त्यामुळे पर्याय भरपूर वाढले आहेत. आधुनिक स्टाइलचे पण पारंपरिक टच असलेले प्रयोगशील दागिन्यांचा आनंद घेता येईल.

## बॉडी ज्वेलरी... नवा ट्रेंड

यंदाचा सर्वात वेगळा ज्वेलरी ट्रेंड पाहायला मिळाला तो म्हणजे 'बॉडी ज्वेलरी.' हा नवा ट्रेंड तरुणींमध्ये हळूहळू



रुजू लागलाय. एरवी खांद्यावरून रुळणारा पदर, दुपट्टा असं वर्णन केलं जायचं. पण आता हे वर्णन दागिन्यांबद्दल होण्यास सुरुवात झाली तर आश्चर्य वाटायला नको. नेकपीसला जोडून येणाऱ्या, खांद्यावरून हातावर रुळणाऱ्या मोत्यांच्या किंवा खड्यांच्या सरी, मनगटावरील कडा आणि बोटातील अंगठ्यांना जोडणारी हातफुलाची सर, कानातल्या डुलाच्या मागून हळूच केसांना भेटणाऱ्या बारीक सरी, मांगटिका किंवा हेडपीसला पदर, केसात डुलणाऱ्या बारीक सरी हे या पद्धतीच्या ज्वेलरीचे काही प्रकार आहेत. बेली नृत्य करणाऱ्या मुलींच्या ब्लाऊजला जोडलेल्या आणि पोटापर्यंत लोंबकळणाऱ्या माळा असतात. या नृत्याचा मुख्य फोकस नृत्यांगनांच्या पोटाकडे असल्यामुळे या नृत्य सादर करताना, त्या माळांमुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधले जाते. मध्यंतरी गळा, हात फोकसमध्ये येतील अशा प्रकारे माळा लावलेले टॉप, कुर्ते बाजारात आले होते. आता ही जागा दागिन्यांनी घेतली आहे. अशा प्रकारच्या पदरीकरणाने त्या अवयवाचे सौंदर्य खुलते. सध्या इमिटेशन ज्वेलरीमध्ये या प्रकारांना असलेली मागणी पाहता सोन्याच्या दागिन्यांमध्येही हे प्रयोग करण्यात येत आहेत. अर्थात स्त्रियांना दागिन्यांबद्दल कुतूहल आणि प्रेम आहे, तोपर्यंत हे प्रयोग होत राहणार. त्यामुळे ही लखलखती दुनिया कायम तेवत राहणार, हे नक्की.



दागिन्यांचा विषय निघाला की चर्चेचा मोर्चा सहजच इतर देशांकडे वळतो. दरवर्षी कपडे, ॲक्सेसरीज यांच्यासोबत दागिन्यांचे ट्रेण्डसुद्धा जगभरात बदलत असतात. यंदाच्या जगभरातील दागिन्यांच्या ट्रेण्डवर एक नजर....

# भारताबाहेरचे ट्रेण्ड्स!

## स्टेटमेंट इअररिंग्स

गेल्या काही वर्षांपासून नेकपीसला जास्त महत्त्व दिलं गेलं होतं. आता मात्र फोकस इअररिंग्सवर आहे. मोठाले, लांब कानातले डूल यंदा आवर्जून पाहायला मिळतील. प्लास्टिक, थ्रीडी तंत्रज्ञान यामुळे दागिन्यांचं वजन काही प्रमाणात कमी झालं आहे. त्याचा परिणाम म्हणून ओव्हरसाइज कानातले यंदा न्यूयॉर्क आणि पॅरिसच्या रनवेवर पाहायला मिळाले. अर्थात यांच्यासोबतच मोती, रंगीत खडे, सोने, हिरे यांचा वापरही इअररिंग्समध्ये आवर्जून करण्यात आला होता. इअररिंग्समधील यंदाचा महत्त्वाचा बदल म्हणजे दोन्ही कानांतील समान इअरिरग्सना फाटा देत एकाच कानात इअररिंग घालायची किंवा दोन्ही कानात वेगवेगळे इअररिंग्स घालायची पद्धत यंदा रुजू झाली आहे. आपल्याकडे मागच्या वर्षी इअरकफचा ट्रेण्ड आला होता. एका किंवा दोन्ही कानांमध्ये संपूर्ण कानाच्या आकाराचं, नजरेत भरणारं इअरकफ घातलं जायचं. पण तेव्हा दुसऱ्या कानामध्ये छोटा खडा घातला जायचा. पण यंदा मात्र इअरकफसोबत दुसरा कान मोकळा सोडला जातोय. तसचं इअरकफचा आकारही वाढला आहे. सध्या दैनंदिन वापरातचं नाही तर पार्टी, समारंभाला जातानासुद्धा वेगवेगळे दागिने घालण्याऐवजी एकच नजरेत भरणारा दागिना घालण्याकडे तरुणाई पसंती देत आहे. हे दागिन्यांचा आकार वाढण्याचं मुख्य कारण आहे. याचबरोबर तुम्हाला दोन्ही कानांत डूल घालायचेच असतील तर दोन वेगवेगळे डूल घालायचा प्रयोगही यंदा केला गेलाय. तुमच्या ड्रेसमधील दोन मुख्य रंग निवडून (कॉन्ट्रास असतील तर उत्तम) त्या रंगाचे कानातले यात घातले जातात. यामध्ये दोन्ही कानांतल्यांचा आकार वेगळा असेल तरी चालू शकतं. पण सुरुवातीला प्रयोग करताना किमान एक घटक समान असू द्या. उदा. मूळ चौकोनी आकाराचे कानातले निवडून दोघांचे आकार छोटे-मोठे असू द्या. दोन्ही कानांतल्यांचा बेस रंग समान असू द्या. तसेच एक कुंदन आणि एक हिऱ्याचं डूल असं एकदम टोकाचे कानातले निवडून चालणार नाही. शक्यतो दोन्ही कानातले मोठे, केसांमध्ये न लपता पटकन नजरेत येणारे असू द्या. तुम्हाला पारंपरिक इअररिंग्स पसंत असतील तर कानाच्या आकारापेक्षा मोठे आणि भौमितिक आकारांचे इअररिंग्स वापरता येतील.

## पारंपरिक मोटिफ्स आणि मोती

दागिन्यांमध्ये नक्षीकाम आणि मोटिफ्स कोणते वापरतो, याला अधिक महत्त्व आहे. पेझ्ली, फ्लोरल, मीनाकारी, भौमितिक, प्राणी-पक्ष्यांचे आकार असे कित्येक मोटिफ्स दागिन्यांमध्ये वापरले जातात. यंदा नवीन चिन्हे निवडण्याऐवजी पारंपरिक चिन्हांना डिझायनर्सनी पसंती दिली आहे. यामध्ये कित्येक धार्मिक चिन्हांचा, पुरातन वास्तूमधील चिन्हांचा प्रामुख्याने समावेश आहे. ख्रिश्चनांचा क्रॉस, इजिप्त, ग्रीक संस्कृतीतील चिन्हे, प्राण्यांचा आकार यांचा समावेश केला गेलाय. फ्लोरल आकारांवरसुद्धा ग्रीक, पर्शियन शिल्पकलेचा प्रभाव आवर्जून पाहायला मिळतो. यंदाच्या दागिन्यांमध्ये प्रामुख्याने नजरेत येणारा घटक म्हणजे मोती. मोठाले, शक्यतो सफेद मोती यंदा कित्येक डिझायनर्सनी दागिन्यांमध्ये वापरले आहेत. हिरे आणि इतर धातूंच्या तुलनेत मोत्यांचे दागिने कपडय़ांच्या वेगवेगळ्या रंगांवर खुलून दिसतात. तसेच पारंपरिक, फॉर्मल, पार्टीवेअर सगळ्याच लुकवर ते वापरता येतात. त्यामुळे मोत्यांचा वापर यंदा दागिन्यांमध्ये केला गेलाय. सफेद आणि क्रीम रंगाच्या मोतींसोबत रंगीत मोतीही यंदा वापरले गेले आहेत. यांच्यासोबतच रंगीत मिनरल्सचा वापरसुद्धा पेण्डंटमध्ये केला गेलाय. सोने, चांदी, प्लॅटिनम या खऱ्या धांतूऐवजी प्लास्टिक, सोन्याचांदीचं पाणी चढवलेले धातू, लेदर, कापड यांचा वापरही दागिन्यांमध्ये केला गेलाय.

## चोकर आणि नाजूक नेकपीस

यंदा इअररिंग्सवर अधिक लक्ष दिलं गेल्याने नेकपीस सिंपल ठेवण्याकडे बऱ्याच डिझायनर्सनी पसंती दिली आहे. विशेषतः ९०च्या दशकातील गळ्याभोवती घट्ट बसणारा चोकर पुन्हा पाहायला मिळतो आहे. पण यंदा त्याचं रूपं विस्तारलं आहे. पारंपरिक लेदर किंवा प्लास्टिकच्या पट्ट्याच्या चोकरसोबत धातू, मणी यांचा वापर करून केलेले मोठाले चोकरसुद्धा लक्ष वेधून घेत आहेत. तुम्हाला गळाबंद चोकर नको असेल तर नाजूक पेण्डण्ट किंवा नेकपीसचा पर्यायसुद्धा डिझायनर्सनी दिला आहे. मध्यम आकाराच्या खड्यांची नाजूक माळ किंवा नाजूक सरीसोबत मोठाले पेण्डण्ट हे प्रकार यंदा आवर्जून पाहायला मिळतील. अर्थात हे पेण्डण्टसुद्धा इअररिंग्सप्रमाणेच आकाराने मोठे आहेत. कानातून गळ्याभोवती जाणारा नेकपीस, स्कार्फप्रमाणे गळ्यामागून येत समोर मोकळा सोडलेला नेकपीस असे कित्येक प्रयोग डिझायनर्सनी यंदा केले आहेत.

## आर्मकफ आणि अंगठ्या

मघाशी म्हटल्याप्रमाणे अंगभर दागिने घालण्यापेक्षा एक नजरेत भरणारा दागिना घालण्याकडे डिझायनर्सचा यंदा कल आहे. त्यातीलच एक प्रकार म्हणजे आर्मकफ. थोडक्यात सांगायचं झाल्यास अंगठी आणि कड्याला जोडणाऱ्या हातफुलाचं उदाहरण घेता येईल. पण इअररिंग्सप्रमाणेच या आर्मकफचा आकार मोठा आहे. फ्लोरल आकारांसोबत दोरीची नॉट, वेल, भौमितिक आकार या विविध आकारांचा वापर यात केला आहे. यावर्षी खडे, मोती, माणिक यांच्या मोठय़ाला अंगठय़ासुद्धा नक्की पाहायला मिळतील. पण हल्ली एकच अंगठी घालून भागत नाही. सगळ्या बोटांमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या अंगठ्या घालायची पद्धत आता रुजू झाली आहे. अगदी एकाच बोटात दोन-तीन अंगठ्याही घातल्या जातात. त्यानुसार नाजूक अंगठ्याही पाहायला मिळतात. काही वर्षांपूर्वीपर्यंत परदेशातील हे ट्रेण्ड्स भारतात येईपर्यंत दोन-तीन वर्षे जायची. पण हल्ली मात्र जागतिक ट्रेण्ड्स भारतात लगेचच पाहायला मिळतात. त्यामुळे हे ट्रेण्ड्स न्यूयॉर्क, पॅरिसमध्ये दिसून आले असले, तरी भारतातसुद्धा त्यांची चाहूल लागलेली आहे.

# शॉर्ट न्यूज

## वार्ड बॉयला मारहाण, दोघांवर गुन्हा

■ **नगर :** शहरातील कायनेटिक चौक परिसरातील एका हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या वॉर्ड बॉयला दोघांनी मारहाण केली. रविवारी (दि.८) रात्री सव्वा बाराच्या सुमारास दिल्ली गेटजवळ ही घटना घडली. विवेक संतोष आमृते असे जखमीचे नाव आहे. याप्रकरणी दोघांविरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी यश शेवाळे व संकेत पाटोळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मनसेच्या शहराध्यक्षपदी प्रशांत वाकचौरे

■ **शिर्डी :** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी शिर्डी विद्यार्थी सेना शहराध्यक्ष प्रशांत वाकचौरे यांच्या कामाचे कौतुक करत त्यांची शिर्डी विद्यार्थी सेना शहराध्यक्ष म्हणून निवड केली आहे. विद्यार्थी सेनेच्या माध्यमातून प्रशांत वाकचौरे यांनी युवकांचे मोठे संघटन करून गरजू घटकांना तसेच साईबाबा संस्थान मधील कामगारांना विविध प्रश्नांसंदर्भात न्याय मिळवून देण्यासाठी आंदोलने छेडली. तसेच सातत्याने अनेकसमाजोपयोगी कामे राबवली.

## मयूर गुंजाळला क्रीडारत्न पुरस्कार

■ **संगमनेर :** संगम सेवाभावी संस्थेच्या डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी मयूर गुंजाळ याने स्केटिंग या क्रीडा प्रकारात राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली. त्याबद्दल त्याला मेजर ध्यानचंद राज्यस्तरीय क्रीडारत्न पुरस्काराने गौरविण्यात आले, अशी माहिती प्राचार्या रेखा पवार यांनी दिली. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सातारा जिल्ह्यातील कराड येथे आयोजित विविध क्रीडा स्पर्धांमध्ये राज्यस्तरावरउल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरावरील क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## सालकऱ्याच्या मुलाचे एमपीएससीत यश

■ **श्रीगोंदा :** एरंडोली येथील भूमिहीन सालकऱ्याचा मुलगा देवराम दशरथ रायकर यांच्या आईला दोन वेळा हृदयविकाराचा झटका आला. देवरामने स्पर्धा परीक्षेचा प्रयत्न सोडला. मात्र, आईने पाठीवर हात ठेवला. देवराम याने कठोर परिश्रम घेऊन एमपीएससी परीक्षेचे शिखर सर केले. वैद्यमापक निरीक्षकपदी त्याची नुकतीच वर्णी लागली. त्याच्या यशाने एरंडोलीकरांनी जल्लोष केला. देवराम रायकर यांच्या आई- वडिलांचे मूळ गाव हंगेवाडी आहे. जमीन-जुमला नसल्याने दशरथ व विमल यांनी सालकरी कुटुंब म्हणून चिंचणी येथे प्रपंच थाटला.

## ऊस पेटवून दिला, एकावर गुन्हा दाखल

■ **नेवासा :** तालुक्यातील भेंडा शिवारातील तीन एकर ऊस पेटवून दिल्याची फिर्याद नेवासा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली असून याबाबत कुकाणा येथील एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अरुण अशोक गरड (वय ४१) धंदा शेती यांनी फिर्याद दिली असून त्यात म्हटले की, सव्वा वाजण्याच्या सुमारास रवींद्र विठ्ठल उंडे (रा. कुकाणा) याने त्यांच्या भेंडा शिवारातील १४ महिन्याचा तीन एकर ऊस व ठिबक सिंचन संचाच्या नळ्यांना आग लावून पेटवून दिल्याने साडेचार लाख रुपयांचे नुकसान झाले.

# शिरूरला बेशिस्त वाहनचालकांकडून एकाच दिवशी ४० हजारांचा दंड वसूल !

### नवनियुक्त पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांचा कारवाईचा बडगा

**शिरूर : सतीश डोंगरे**

**शिरूर पोलिस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी पदभार स्विकारल्यानंतर लगेच कारवाईचा बडगा उगारत बेशिस्त वाहन चालकांकडून सोमवारी एकाच दिवशी ४० हजार ५०० रुपये दंड वसूल केला. यावेळी सुमारे ४४ वाहनधारकांवर कारवाई करण्यात आली.**

शिरूर शहरांमध्ये शिरूर वाहतूक पोलिसांकडून सिटीबोरा कॉलेज रोड, निर्माण प्लाझा, बी.जे. कॉर्नर या ठिकाणी बेशिस्त तसेच अल्पवयीन वाहन चालक यांच्या ४४ वाहनांवर कारवाई करत ४० हजार ५०० रुपये दंड आकारण्यात आला असून शिरूर शहरांमध्ये विना नंबर प्लेट, फॅन्सी नंबर प्लेट नंबर, नंबर प्लेटवर नाव टाकणे, ट्रिपल सीट, विना लायसन, भरधाव वेगात मोटर सायकल चालवणे, बुलेट मोटरसायकलचे फटाके वाजवणे, काळ्या रंगाच्या काचा असणाऱ्या फोर व्हीलर अशा वाहन चालकावर सोमवारी कारवाई करण्यात आली.



या कारवाईत पोलीस हवालदार राजेंद्र वाघमोडे, पोलीस अंमलदार वीरेंद्र सुंबे, पोलीस अंमलदार आप्पासाहेब कदम, पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर गोरे, पोलीस अंमलदार विक्की यादव, पोलीस अंमलदार विनोद काळे आदींनी सहभाग घेतला. यापुढे ही कारवाई अजून तीव्र करण्यात येणार असून त्याबरोबरच नागरीकांच्या मागणीवरुन रोड रोमियो पथकही सक्रिय केले आहे.

आपल्या १८ वर्षा खालील लायसन्स नसलेल्या पाल्यांना मोटर सायकल चालवण्यास देऊ नये अन्यथा वाहन मालकांवर व पालक यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी यावेळी दिला.शिरुरमधील पदभार स्विकारण्यापूर्वी केंजळे हे गोंदिया, गडचिरोली, मुंबई, विक्रोळी, सिंधूदुर्ग, पुणे शहरातील स्वारगेट येथे कार्यरत होते तेथेही त्यांनी असेच धडाकेबाज काम केले आहे.

# तर भाजपमध्ये येवून फडणवीसांची अडचण दूर करा!

### श्रीराम गणपुले यांचा आ.थोरातांना सल्ला

**संगमनेर : प्रतिनिधी**



**आमचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एवढीच काळजी असेल तर तुम्ही भाजपमध्ये येवून त्यांची अडचण दूर करण्याचा प्रयत्न करा, म्हणजे तुमचाही मार्ग मोकळा होईल असा उपरोधिक सल्ला भाजपाचे शहर अध्यक्ष ॲड. श्रीराम गणपुले यांनी आ.बाळासाहेब थोरात यांना दिला.**

भारतीय जनता पक्षामुळे देवेंद्र फडणवीस अडचणीत आल्याचे वक्तव्य आ.थोरात यांनी केले याबाबत श्रीराम गणपुले यांनी सल्ला देवून फडणवीस यांची अडचण दूर करण्यासाठी आ.थोरात यांना थेट भाजपा मध्येच येण्याचे आवाहन केले.
सोयीनूसार राजकारण करण्याची आ.थोरात यांची निती संपूर्ण राज्याने पाहीली आहे.एकीकडे कॉंग्रेसचा निष्ठावान म्हणून मिरवून घ्यायचे आणि दुसरीकडे स्वताच्या राजकीय फायद्यासाठी भाजपाच्या नेत्यांची हातमिळवणी करायची तेव्हा भारतीय जनता पक्ष त्यांना अडचणीचा वाटत नाही. स्वता:चा भाचा अपक्ष उभा करायचा, त्याच्यासाठी भाजपाचा पाठींबा घ्यायचा, शिक्षक मतदार संघात महाविकास आघाडीच्या उमेदवाराविरुद्ध अपक्ष उमेदवार उभा करायचा, त्याला संस्थात्मक सर्व रसद पुरवायची, सगे-सोयऱ्यांचे राजकारण करुन जिल्ह्यात व पक्षात वजन असल्याचा खोटा आव आणायचा हे सर्व करणाऱ्या बाळासाहेब थोरातांनी आपल्या पक्षातील झालेली दुर्दशा सुधारण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्याचे सोडून देवेंद्रजी आणि भारतीय जनता पक्ष यांची काळजी करणे म्हणजे आपले ठेवायचे झाकून आणि लोकाचं पहायचं वाकून असा प्रयोग असल्याची टिका गणपुले यांनी केली.

आ.थोरातांना भाजपाची आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेच्या निवडणूकीच्या तोंडावर अचानक काळजी वाटायला लागणे आणि देवेंद्रजींवर अन्याय झाल्याचे वाटणे हे अचानक घडले नाही अशी शंका आहे.


मागील वर्षभर पुढे केलेल्या मुलीची संभाव्य आमदारकी धोक्यात आल्याचे तर हे लक्षण नाही ना अशीही शंका त्यांच्या वक्तव्यांतून येवू लागली आहे. उघडपणे वैचारीकबदल न स्विकारता तात्पुरत्या तडजोडीं मधून स्वता:ची बाजू सुरक्षित करुन घेण्याचा आणि देवेंद्रजींसाठी खोटी सहानूभुती दाखवून मुलीचे राजकीय भवितव्य सुरक्षित करण्याचा हेतू दिसतो. देवेंद्रजी एवढी काळजी बाळासाहेब थोरातांना होती व आहे तर २०१९ सालात देवेंद्रजींना दगाफटका करुन, महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री बसविताना १०५ घरी बसविल्याचा १०८ वेळा जप करुन असूरी आनंद का व्यक्त केला? हे तथाकथित संभावित सुसंस्कृतपणाचा बुरखा पांघरुन हिंडणाऱ्या थोरातांनी स्पष्ट करावे.

२०१९ मधले बाळासाहेब थोरात खरे की २०२४ मधले बाळासाहेब थोरात खरे याचाही खुलासा संगमनेरच्या आम जनतेला आता हवा आहे. अन्यथा आपले पडझड झालेले कॉंग्रेसचे घर सावरावे असे आव्हान देवून देवेंद्रजींना बाळासाहेब थोरातांच्या दाखल्याची अगर सहानुभूतीची गरज नाही. ते कट्टर विचाराधारेशी बांधिल असलेले नेते आहेत. हे त्यांनी त्यांच्या २०१४ पासूनच्या कर्तबगारीने सिद्ध केले आहे. पक्ष देईल ती जबाबदारी आणि पक्ष ठरवेल ती पुर्वदिशा मानणाऱ्या कार्यकर्त्यांच्या परंपरेतल्या देवेंद्रजी फडणवीस यांना बाळासाहेब थोरातांच्या पुतना मावशीच्या प्रेमाची गरज नसल्याचे गणपुले यांनी ठणकावून सांगितले.

## वाचकांच्या लेखणीतून

# ताकद आपल्या कथावाङ्मयाची

प्राचार्य शिवाजीराव भोसले हे वक्ता दशसहस्त्रेषु होते.
पट्टीचे वक्ते होते.
फलटणच्या मुधोजी महाविद्यालयात प्राध्यापक होते. प्राचार्य होते. साहित्यिकही होते. त्यांनी गाथा वक्तृत्वाची, यक्षप्रश्न, जागर, देशोदेशीचे दार्शनिक, हितगोष्टी आदी ग्रंथही लिहिले आहेत. त्यांची लेखनशैली आणि वक्तृत्वशैली अवघड गोष्ट सोपी करून सांगणारी किंवा प्रासादिक होती. यातले रहस्य त्यांच्या प्राध्यापकी जीवनाला, थोर वक्त्यांची ऐकलेली भाषणे आणि आजीचे संस्कार यांत आहे असे वाटते.



मुंबईत प्राचार्यांचे वक्तृत्व ऐकण्याचा योग आला होता. ते आपल्या भाषणात म्हणाले, मी त्यावेळी लहानच होतो. माझी आजी मला नेहमी सांगायची,
''जगबुडी होणार आहे.''
''जगबुडी होणार आहे.''
एकदा न राहवून उत्सुकतेपोटी मी तिला विचारले, ''आजी, कधी गं होणार जगबुडी?''
''मुंग्या काम करायच्या थांबतील त्या दिवशी!'' आजी म्हणाली.
मुंग्या म्हणजे अविरत श्रमाचे प्रतीक.
आजीने बालशिवाजीला सांगितलेली ही कथा मोठी उद्बोधक आहे. संक्षिप्त आहे. अगदी प्रासादिक शैलीत समजावून सांगितलेली आहे. ही ताकद आपल्या कथावाङ्मयाची!

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# नगर- मनमाड रस्त्यावरील अवजड वाहतुकीत बदल

### पर्यायी मार्ग वापरण्याचे प्रशासनाचे आवाहन



**नगर : प्रतिनिधी**

**नगर-मनमाड रस्त्यावरील विळद बायपास ते पुणतांबा फाटापर्यंत अवजड वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी याबाबत नुकतेच आदेश काढले आहेत. ८ ते १७ सप्टेंबरपर्यंत हा आदेश लागू राहणार आहे. दरम्यान, यापूर्वी देखील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली होती. आता पुन्हा नव्याने आदेश काढण्यात आले आहेत.**

असा असणार पर्यायी मार्ग
नगर- मनमाड या महामार्गाचे दुरूस्तीच्या कामामुळे वाहतूक पर्यायी मार्गाने वळवण्यात आली आहे. नगर-पुणे-सोलापूरकडून मनमाडकडे जाणार्या सर्व प्रकारच्या अवजड वाहतुकीकरिता कल्याण बायपास चौक, नगर- कल्याण महामार्गावरून आळेफाटा, संगमनेर मार्गे नाशिककडे किंवा विळद घाट, दूध डेअरी चौक, शेंडी बायपास, नगर- छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून कायगाव, गंगापूर, वैजापूर- येवला मार्गे इच्छित स्थळी जातील.

शनिशिंगणापूर-सोनई रस्त्यावरून मनमाड (राहुरीकडे) कडे येणारी सर्व प्रकारची अवजड वाहतूक नगर- छत्रपती संभाजीनगर महामार्गावरून इच्छितस्थळी जातील. तसेच मनमाड, येवला, शिर्डीकडून नगर मार्गे पुणे-मुंबई कल्याणकडे जाणार्या सर्व प्रकारच्या अवजड वाहतुकीकरिता मार्ग पुणतांबा फाटा, झगडे फाटा, सिन्नर-नांदूर शिंगोटेसंगमनेर, आळेफाटा मार्गे असेल. मनमाड- येवलाकडून नगर-सोलापूर-बीडकडे येणार्या सर्व प्रकारच्या अवजड वाहतुकीकरिता मार्ग- पुणतांबा फाटा येथून वैजापूर, गंगापूर कायगाव, प्रवरासंगम, शेंडी बायपास, विळद घाट केडगाव बायपास मार्गे असेल. लोणी-बाभळेश्वर-श्रीरामपूरकडून नगरकडे येणारी सर्व प्रकारची अवजड वाहतूक बाभळेश्वर-श्रीरामपूर-टाकळीभान-नेवासा मार्गे-नगर अशी असणार आहे.

# छत्रपती संभाजी राजे, बच्चू कडू आणि राजू शेट्टी एकत्र!

### राज्यात विधानसभेसाठी तिसऱ्या आघाडीची शक्यता?

**परभणी : प्रतिनिधी**

**राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिसऱ्या आघाडीची चाचपणी सुरू असल्याचे स्पष्ट झाले आहे. स्वराज्य पक्षाचे प्रमुख छत्रपती संभाजीराजे, प्रहार पक्षाचे प्रमुख बच्चू कडू तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी एकत्र येत तिसरी आघाडी निर्माण करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्या अनुषंगाने बच्चू कडू, छत्रपती संभाजीराजे आणि राजू शेट्टी यांनी ओला दुष्काळ पाहणी दौरा सुरू केला आहे.**

परभणी येथील ओला दुष्काळाची पाहणी बच्चू कडू, छत्रपती संभाजीराजे आणि राजू शेट्टी यांनी केली. परभणी येथील मानवत तालुक्यातील रामेटाकळी येथील शेतकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधत त्यांच्या झालेल्या पिकांच्या नुकसानीची पाहणी या तिघांनी एकत्रित केली आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याच पार्श्वभूमीवर या तिघांनी एकत्रित येत येथील समस्या तसेच परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी हा दौरा सुरू केला आहे.



शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर बच्चू कडू यांनी सरकारने त्वरित शेतकऱ्यांची नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी राज्य सरकारकडे केली आहे. उद्योगांप्रमाणे शेतीलाही विमा हवा, असेही बच्चू कडू यावेळी म्हणाले. अशा प्रकारची अतिवृष्टी होणे हे नेहमी होते आणि नेहमीच शेतकऱ्यांना अडचणी निर्माण होतात. म्हणून आम्ही सरकारला कायमचा उपाय सांगत आहोत की, पेरणी पासून ते कापनीपर्यंत सगळा खर्च योजनेमध्ये बसवला पाहिजे. मजूरीचा खर्च जर योजनेमध्ये बसला तर गावात मजूर पण स्थिर होईल आणि शेतकरी पण स्थिर होईल. यामुळे नुकसान पण कमी होईल, असे बच्चू कडू यावेळी म्हणाले.

पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले, आता आपण बघतो की शेतकऱ्यांचे नुकसान झाले की त्याचे पंचनामे होतात आणि तीन महिन्यानंतर त्याचे पैसे शेतकऱ्यांना मिळतात. असे न करता नुकसान भरपाई लगेच मिळाली तर बरे होईल. जसे उद्योगांना विमा असतो, तसा शेतीला तुम्ही का देत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, आता आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांची मोर्चेबांधणी सुरू असल्याचे दिसत आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था | एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# निघोज सोसायटीचे अडीच वर्षात २४ कोटी कर्ज वितरण

■ चेअरमन सुनील वराळ यांची माहिती ■ संस्थेची ७३ वी सर्वसाधारण सभा खेळीमेळीत



■ निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीकडून गेल्या अडीच वर्षात २४ कोटी रूपयांचे कर्ज वितरण करण्यात आले असून तो एक उच्चांक असल्याचे संस्थेचे चेअरमन सुनील वराळ यांनी सांगितले.**

निघोज सोसायटीची ७३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन सुनील वराळ यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली. यावेळी चेअरमन वराळ यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेतला.

सोसायटीचे सभासद हे सोसायटीचे मालक आहेत या सामाजिक भावनेतून पदाधिकारी व संचालक कार्यरत असून सभासदांच्या सहकार्याने सोसायटीची विकास झाला असल्याचे वराळ यांनी यावेळी बोलताना सांगितले. यंदा दोन कोटी रूपयांचे कर्ज वितरण करण्यात आले असून बॅंक पातळीवर ९९ टक्के वसुली करण्यात आली. गेल्या वर्षी कर्मचा-यांना वेतन वाढ तसेच आरोग्य विम्याची सुविधा देण्यात आल्याचे वराळ म्हणाले.

यावेळी वसंत कवाद, आर.के.वराळ, ठकाराम लंके, नामदेवराव थोरात,सोमनाथ वरखडे, चंद्रकांत लामखडे, अमृताशेठ रसाळ, रामदास वरखडे, ज्ञानेश्वर वरखडे, चंद्रकांत लंके, शांताराम लाळगे, रामदास भोसले, वसंत ढवण, दत्तात्रेय लंके, रामदास रसाळ, शिवाजीराव लंके संतोष लामखडे, शांताराम कवाद, हिराभाउ सोनवणे, अंकुश लोखंडे,असिम हवालदार, किसान वरखडे, मंदा ढवळे, मनिषा वराळ यांच्यासह सभासद यावेळी उपस्थित होते. संचालक दत्तात्रय लंक व सचिव रामदास भोसले यांनी विषय वाचन केले. सर्व विषयांना यावेळी एकमताने मंजुरी देण्यात आली.

## ११ टक्के लाभांश आणि ड्रोन खरेदी

**या सभेत ११ टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली. संस्थेचे सभासद हौशीराम शेटे यांनी औषध फवारणीसाठी सोसायटीने ड्रोन खरेदी करण्याची मागणी केली. हा ठराव यावेळी सर्वानुमते मंजुर करण्यात येऊन लवकरच ड्रोन खरेदी करण्यात येणार असल्याचे यावेळी चेअरमन वराळ यांनी जाहिर केले.**

## पाणी मागणी अर्ज दाखल करा

**कुकडी डावा कालव्याचे पाणी कायमस्वरूपी मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी पाटबंधारे विभागाकडे पाणी मागणी अर्ज दाखल करावेत. जेणेकरून निघोज परीसराला मुबलक पाणी मिळू शकेल. अन्यथा हे पाणी पुढे जाउन शेतकरी पाण्यापासून वंचित राहतील.**

**ठकाराम लंके**
मा. सरपंच

# इंग्रजांच्या अत्याचाराविरोधात नाईक यांनी आवाज उठविला

■ खासदार नीलेश लंके यांचे प्रतिपादन ■ अळकुटी येथे उमाजी नाईक जयंती

**अळकुटी : प्रतिनिधी**

**इंग्रजांच्या अत्याचारी शासनाविरोधात आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक यांनी सर्वप्रथम आवाज उठवून त्यांच्या आर्थिक नाडया दुर्बल करण्याचा प्रयत्न केल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.**

उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त अळकुटी येथे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहून खा. नीलेश लंके यांनी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बाबाजी भंडारी, बाळासाहेब पुंडे, महेश शिरोळे, सुभाष पुंडे, शरद घोलप, साहेबराव बोरूडे, महादू भंडारी, संदीप शितोळे, अप्पासाहेब कुरेशी, शुभम शिरोळे, निखिल शिरोळे, उदय पुंडे, उमाजी नाईक मित्र मंडळाचे सर्व सभासद, ग्रामस्थ, ग्रामस्थ उपस्थित होते.



उमाजी नाईक यांनी भांबुर्डा दुर्ग येथे इंग्रजांनी लपविलेला खजिना त्यांच्या सशस्त्र साथिदारांच्या मदतीने लुटून इंग्रजांच्या नाकात दम आल्याचे सांगत यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, आपला देश आणि धर्म यासाठी इंग्रजी सत्तेविरूध्द क्रांतीची पहिली मशाल पेटविणारे उमाजी नाईक भारतीय स्वातंत्र्य लढयातील पहिले क्रांतीवीर ठरले. इंग्रजी सत्तेला भारतातून हटविण्यासाठी त्यांनी सहकारी गोळा केले. तीन-चारशे तरूण त्यांना येऊन मिळाले. क्रांती करायची, बंड करायचे इंग्रजी सत्तेशी दोन हात करायचे तर पैसा हवा, शस्त्रे हवीत हे जाणून त्यांनी लूट करण्यास सुरूवात केली. मात्र सामान्य जनतेच्या केसालाही धक्का लागणार नाही याची त्यांनी पुरेपुर काळजी घेतली. इंग्रजांविरूध्द बंड करायला निघालेला, गोऱ्या साहेबाची वाट अडविणारा म्हणून उमाजी नाईक प्रसिध्दीस पावल्याचे खा. लंके म्हणाले.

# चिमुकल्या स्वराच्या मदतीसाठी सरसावले लोणीमावळाकर

वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदतीचे आवाहन

**लोणी मावळा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील स्वरा अजय बोरूडे हिचा खेळत असताना कडबा कुट्टीमध्ये हात गेल्याने तिचा हात तुटून हाताचे तुकडे तुकडे झालेले आहे. या चिमुकल्याच्या वैद्यकीय उपचाराच्या खर्चासाठी ग्रामस्थ मदतीसाठी सरसावले असून थोर दानशुरांनी मदत करावी अशी आवाहन सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब शेंडकर यांनी केले.**

याबाबतची माहिती अशी की स्वरा अजय बोरुडे ही इयत्ता तिसरीमध्ये शिकत आहे. ही आपल्या घरी कडबा कुट्टी मशीन जवळ खेळत असताना तिचा हात कडबा कुट्टीत गेला. आणि त्या हाताचे तुकडे पडले. त्यामुळे तिला गंभीर दुखापत झालेली आहे. तिला औषधोपचार आणि वैद्यकीय मदतीची नितांत आवश्यकता आहे. परंतु तिच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाकीची असून आई-वडील रोजंदारी करून आपला उदरनिर्वाह करीत आहे.



स्वराच्या उपचारासाठी त्यांच्याकडे आर्थिक कुवत नसल्याने ग्रामस्थांनी लोकवर्गणी करून तिचा औषधोपचार करत आहे. तिच्या औषध उपचारासाठी आणखी आर्थिक मदतीची आवश्यकता आहे या संकटाच्या काळात, लोकांना आर्थिक मदत करावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब शेंडकर यांनी आवाहन केले आहे.

# स्नेहालय संस्थेकडून कौडेश्वर वाचनालयास पुस्तके भेट

समाजजीवनाचा आरसा असलेली वाचनीय ग्रंथसंपदा



**सुपा : प्रतिनिधी**

**नगर येथील स्नेहालय संस्थेने शहाजापुर येथील कौडेश्वर सार्वजनिक वाचनालयास पुस्तके भेट दिली आहेत. समाजसेवेचा वारसा घेतलेल्या व अनाथांचे पालकत्व स्वीकारलेल्या स्नेहालय संस्थेचे प्रमुख डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी संस्थेने प्रकाशित केलेली व समाज जीवनाचा आरसा असलेली वाचनीय पुस्तके ग्रंथालयास भेट दिली.**

यामध्ये डॉ.गिरीश कुलकर्णी लिखित " देवस्वरुप" " जीवनव्रतीच्या पाऊल खुणा ", ज्येष्ठ पत्रकार व इतिहास अभ्यासक भुषण देशमुख व डॉ. गिरिशा कुलकर्णी यांनी प्रकाशीत केलेले " देवमाणूस ", तसेच सुनंदा सदाशिव अमरापूरकर यांनी अनुवादीत केलेले " फिटेअंधाराचे जाळे ", सौ शुभांगी कोपरकर लिखित "परिवर्तनाची पहाट", डॉ.प्राजक्ता कुलकर्णी लिखित मायेचा स्नेहांकुर, तसेच नरक यातना भोगणाऱ्या लालबत्ती भागातील माता भगिनी बालकांचे जटील भीषण प्रश्न साहस,चिकाटी व ध्यास आणि कल्पकतेने सोडविणाऱ्या यशोगाथेचा अंतर्वेध तीन दशकांच्या या प्रवासात उभ्या राहिलेल्या प्रकल्पाची अनुभुती आणि काही सेवावृतींचा कार्य वेध असलेल्या "संवेदना स्नेहालयाच्या" ही अशी महत्वाची पुस्तके भेट दिली.

यावेळी डॉ.कुलकर्णी यांनी स्नेहालयाचा प्रवास व कार्य थोडक्यात सांगितले तर संदीप क्षीरसागर यांनी स्नेहालयाचे चालु असलेल्या कार्याची व उपक्रमाची सविस्तर माहिती दिली.
कौडेश्वर सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेंद्र शिंदे यांनी पुस्तके स्विकारत स्नेहालया विषयी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी स्नेहालयाचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी, निवासी संचालक प्रवीण मुत्याल, प्रतिसाद केंद्र व व्यवस्थापक संतोष धर्माधिकारी,स्नेहालय रेडिओ नगर स्टेशन हेड संदीप क्षीरसागर आदी यावेळी उपस्थित होते.

# वाडेगव्हाण सोसायटीची वार्षिक सभा खेळीमेळीत

सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याचा ठराव

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील वाडेगव्हाण येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीची वार्षिक सभा नुकतीच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.**



सेवा सोसायटीचे चेअरमन रामचंद्र शेळके, व्हा चेअरमन संतोष रासकर सचिव अविनाश ढुबे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सभा पार पडली. या सभेमध्ये सर्व सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याचे व सेवा सोसायटीची नविन इमारत बांधण्याचे ठराव मंजूर करण्यात आले आहे.

सेवा संस्थेच्या वार्षिक सभेला चेअरमन रामचंद्र शेळके, व्हा चेअरमन संतोष रासकर, सचिव अविनाश ढुबे, संभाजी वारे, राजेंद्र शेळके, प्रशांत शेळके, जालिंदर तानवडे, विजय खंदारे, प्रमोद घनवट, चंद्रकांत सोनवणे, मिरा गवळी, मनिषा शेळके, संजय खंदारे, गोपाळ धोत्रे, शंकर कुरकुटे, रामदास यादव यांच्यासह सभासद जयवंत भोसले, मंगेश बोरगे, सदाशिव शेळके, भानुदास खंदारे, रामभाऊ यादव, सुभाष औटी, वसंत घनवट, अकुंश यादव, सुभाष घनवट याच्यासह शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केरळच्या सहलीसाठी पाडळीदर्या शाळेचे ६ विद्यार्थी

डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटरची सहल

**पाडळीदर्या : प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून आयोजित करण्यात आलेल्या केरळमधील थुंबा येथील डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटरच्या सहलीसाठी घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय निवड चाचणी परीक्षेत जिल्हा परिषदेच्या पाडळीदर्या प्राथमिक शाळेच्या सहा विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.**

प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीची मनिषा अनिल जाधव, इयत्ता सहावीची समृध्दी रामदास गिरी, इयत्ता सहावी स्वरा राजू जाधव, इयत्ता सहावी समिक्षा अरूण येवले इयत्ता सहावी दिप्ती संदीप खोसे तर इयत्ता सातवी अनुष्का अनिल खोसे या विद्यार्थ्यांचा यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये समावेश आहे.



सर्व यशस्वी विद्यार्थीनींना पाडळीदर्या शाळेचे शिक्षक संजय गायकवाड, श्रीमती वैशाली वैद्य, रामदास बोरूडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यर्थ्यांचे सरपंच रामदास खोसे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास खोसे, केंद्र प्रमुख दौलत येवले, विस्तार अधिकारी रावजी केसकर यांच्यासह ग्रामस्थांनी कौतुक केले.

पाडळीदर्या सारख्या ग्रामीण व डोंगरी भागातील शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलींनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्व अध्ययन करून देश पातळीवरील परीक्षेत तालुका स्तरावरील गुणवत्ता यादीत यश मिळवून पाडळीदर्या गावाच्या नव्हे तर संपूर्ण ग्रामीण भागातील शाळांमध्ये आपले वेगळेपण सिध्द केले आहे.

# डोक्यावर मिरविण्यापेक्षा महापुरूषांना डोक्यात घ्या!

कार्तिकी पवार यांचे आवाहन



## खरी देशभक्ती

**देशातील समस्यांविरूध्द आंदोलन करणे, संविधानाची जाणीव स्वतःला व दुसऱ्याला करून देणे, भारताची प्राचीन संस्कृती पुन्हा रूजविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे खरी देशभक्ती.**

**कार्तिकी पवार**

**पारनेर : प्रतिनिधी**

**महापुरूषांना डोक्यावर मिरविण्यापेक्षा डोक्यात घेणे आवश्यक असल्याचे सांगतानाच ध्येयनिश्चिती करून त्याची पुर्तता करण्यासाठी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन कार्तिकी पवार यांनी केले.**

पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजमध्ये अंतर्गत गुणवत सिध्दता कक्ष, विद्यार्थी विकास मंडळ व सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित युवक आणि देशभक्ती या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कार्तिकी पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
पवार म्हणाल्या, आव्हानांपासून दुर न पळता त्यांचा स्वीकार करावा. ध्येयनिश्चिती करून त्याची पुर्तता करण्यासाठी प्रयत्न करत रहावेत.जोवर यश मिळत नाही तोवर चालत राहायचे. तसेच यश मिळाल्यानंतर विश्रांती न घेता त्यात सातत्य ठेवणे अधिक आवष्यक असते असे पवार यांनी सांगितले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रविंद्र देशमुख, कनिष्ठ महाविद्यलायाचे प्रर्यवेक्षक प्रा. संजय कोल्हे, हिंदी विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार राउत, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. सुखदेव कदम, डॉ. संजय गायकवाड, इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. साफिया तांबोळी, प्रा. शुभांगी काळोखे, प्रा. अनिल ढोले, प्रा. अनिकेत राउत, प्रा. सुरक्षा पाटील, प्रा.डॉ. प्रांजली भराटे, प्रा. गणेश रेपाळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. प्रा. प्रांजली बोरूडे यांनी सुत्रसंचलन, डॉ. हरेश शेळके यांनी प्रास्ताविक तर अनिल ढोले यांनी आभार मानले.

## मोठे होण्याचे स्वप्न पाहा

**मुलींच्या पाठीशी तिचे कुटूंब आणि विशेषतः तिचे वडील उभे असतील तर ती जगात काहीही करू शकते. याचे जिवंत उदाहरण म्हणजे कार्तिकी पवार व तिचे वडील होय. आपल्या संस्कृतीला महान विचारांचा वारसा लाभलेला आहे. चांगले विचार ऐका, पुस्तके वाचा आणि मोठे होण्याचे स्वप्न पाहा.**

**डॉ. लक्ष्मणराव मतकर**
प्राचार्य

# पारनेर पतसंस्थेच्या सभासदांना ११ टक्के लाभांश

■ चेअरमन काशिनाथ दाते यांची घोषणा ■ २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर ग्रामीण पतसंस्थेच्या सभासदांना ११ टक्के लाभांश देण्यात येणार असल्याची घोषणा संस्थेचे संस्थापक चेअरमन काशिनाथ दाते यांनी केली. संस्थेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेत दाते यांनी लाभांश वितरणाची घोषणा केली.**




सभेसाठी संस्थेचे व्हा. चेअरमन सुरेश बोऱ्हुडे, संचालक बाळासाहेब सोबले, आर.एस. कापसे, लक्ष्मण डेरे, मयुर गांधी, अर्जुन गागरे, राजेंद्र औटी, कृष्णा उमाप, सुभाष राठोड, सुनंदा दाते, दिलीप दाते, सुनील गाडगे, आशा तराळ, मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात यांच्यासह सभासद यावेळी उपस्थित होते.

सभेमध्ये सेवानिवृत्त सुभेदार हरीश औटी तसेच संस्था कर्मचारी प्रशांत जवक यांची मुले ज्ञानेश्वरी व यशराज यांनी प्रज्ञा शोध परीक्षेत राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळविल्याबद्दल सत्कार करण्यात आला. देसवडे येथील शिवाजी दाते लिखीत मराठे का हारले पानिपत या पुस्तकाच्या प्रती यावेळी सभेस उपस्थित सभासदांना वितरीत करण्यात आल्या.

यावेळी विषय पत्रिकेवरील सर्व विषय एकमताने मंजुर करण्यात आले. मिष्ठान्न भोजनानंतर सभेची सांगता झाली. संचालक आर.एस.कापसे यांनी सुत्रसंचलन तर उपाध्यक्ष सुरेश बोऱ्हुडे यांनी आभार मानले.

## संस्थेची आर्थिक स्थिती

**संस्थेला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात २ कोटी ५६ लाख ३५ हजार ३७८ रूपये निव्वळ नफा झाला असून ऑडीट वर्ग अ मिळाला आहे. संस्थेकडे मार्च २०२४ अखेर २११ कोटी रूपयांच्या ठेवी जमा झाल्या असून बॅंक गुंतवणूक ६३ कोटी, स्थावर मालमत्ता ३ कोटी ८० लाख तर १७१ कोटी रूपयांचे कर्ज वितरण करण्यात आले असून संस्थेच्या १७ शाखा कार्यरत आहेत.**

**काशिनाथ दाते**
चेअरमन

## अर्धा टक्का जादा व्याज

**देशाची सेवा करून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांना तसेच सैनिकांच्या वीर पत्नीच्या ठेवींवर अर्धा टक्का जास्त व्याज देण्याची घोषणा यावेळी चेअरमन काशिनाथ दाते यांनी यावेळी केली.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com